मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 28 डिसेंबर 2024 | पान- 1

# ई-रिक्षा धारकांना महापालिकेच्या वतीने 30 हजार रुपये अनुदान

## पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत वायु प्रदूषण कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल: शहरातील जास्तीत जास्त ई-रिक्षाधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा ,असे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील वायू प्रदूषण कमी करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच ई-वाहन वापर धोरणाला चालना देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ई वाहन धोरणाअंतर्गत महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ई-रिक्षाधारकांना अनुदान धनादेश देण्यात आला. शहरातील जास्तीत जास्त ई-रिक्षाधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक धोरण २०२१' राबविण्याबाबत मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने शहरातील वायू प्रदूषण कमी करणे तसेच ई-वाहन धोरणाला चालना देणे,ई-वाहन वापरण्यासाठी लोकांना प्रोत्साहन देणे यासाठी महापालिकेच्या वतीने ई रिक्षाधारकांना अनुदान देण्यात येत आहे. त्यानिमित्ताने आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे स्थायी समिती सभागृह येथे ई-रिक्षा धारकांना धनादेश वितरण करण्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते ई-रिक्षाधारकांना प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश वितरीत करण्यात आले.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा वित्त संचालक प्रवीण जैन, आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले, सह शहर अभियंता संजय खाबडे, बाबासाहेब गलबले, प्रमोद ओंभासे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



### वायु प्रदूषण कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल..

» महानगरपालिकेने शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत, जास्तीत जास्त ईव्ही बॅटरी (L5M) इलेक्ट्रिक तीनचाकी प्रवासी वाहतूक वाहन (थ्री व्हिलर पॅसेंजर टी.आर.) तसेच ईव्ही बॅटरी मालवाहतूक (L5N) तीन चाकी माल वाहतूक वाहन यांचा वापर करून शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. महापालिकेच्या हद्दीतील आणि पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नोंद असलेल्या सुमारे १ हजार पाचशे ई रिक्षाधारकांना प्रत्येकी ३० हजार रुपये अनुदान देण्यात येत असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले.

### या बैठकीत मंजूर झालेले विषय...

» शहरातील विविध परिसरातील रस्त्यांची आधुनिक पद्धतीने दुरुस्ती करणे, शहरात विविध ठिकाणी पाईपलाईन टाकण्यासाठी अडथळा येणाऱ्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या उच्च व लघुदाब वीजवाहिन्या स्थलांतरित करणे , विविध प्रभागातील स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे आदी विषयांच्या खर्चास प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली.

> इलेक्ट्रिक वाहनांचा वापर हा शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत परवडणाऱ्या आणि स्वच्छ उर्जेचा वापर, संसाधनाचा सुयोग्य वापर आणि निर्मिती तसेच वातावरणीय बदलांना अनुरूप कृती ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.
>
> -शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# रात्रगस्ती दरम्यान अपडेट टाकणे आता बंधनकारक

## पोलीस आयुक्त कार्यालयाने काढला आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

रात्रगस्तीदरम्यान कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांना आता व्हॉट्स ॲप ग्रुप वर लोकेशन पाठवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच,वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील वॉकीटॉकीवर स्वतः कॉल द्यावा लागणार आहे. नियंत्रण कक्षाने रात्री चारवेळा वरिष्ठ अधिकाऱ्याचे लोकेशन घ्यायचे आहे. पोलीस आयुक्त कार्यालयाकडून काढलेल्या या आदेशामुळे कामचुकार पोलिसांचे धाबे दणाणल्याचे चित्र आहे.




मागील काही वर्षांपासून पोलीस दलात व्हॉट्स ॲपचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ज्यामुळे बहुतांश कामे सोपी तसेच जलद झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने गस्तीवर वॉच ठेवण्याचे महत्वाचे काम व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून होत आहे. दरम्यान, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी नुकतेच अंमलदार आणि पोलीस अधिकारी यांच्या लोकेशन बाबत एक आदेश जारी केला आहे. यामध्ये रात्रगस्त दरम्यान पोलिसांचे लोकेशन तपासणी बाबत सूचित करण्यात आले आहे.

आयुक्तालय हद्दीत, रात्रगस्त प्रभारी अधिकारी म्हणुन पोलीस उपायुक्त तर सहाय्यक प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परीमंडळीय स्तरावर प्रभारी अधिकारी म्हणून वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवाना होताना त्यांनी पोलीस ठाणे, घटनास्थळ भेट आणि रात्रगस्त संपलेनंतर नियंत्रण कक्षास स्वतः कॉल द्यायचा आहे.

नियंत्रण कक्षातील प्रभारी आधिकाऱ्याने रात्रगस्त कर्तव्यावर असलेल्या पोलीस अधिकारी यांचे चार वेळा लोकेशन घ्यायचे आहे. नियंत्रण कक्षाकडून लोकेशन घेत असताना संबंधित पोलीस अधिकारी यांनी स्वतः उत्तर द्यायचे आहे. याव्यतिरिक्त नियंत्रण कक्ष प्रभारी अधिकारी यांनी पोलीस ठाण्यातील अधिकारी/बीट मार्शल यांचे दर दोन तासाला लोकेशन घ्यावे लागणार आहे. संबंधित अधिकारी आणि बीट मार्शल हेदेखील स्वतः कॉलला उत्तर देतील, असे पोलीस आयुक्त चौबे यांनी काढलेल्या आदेशात नमूद असल्याने अनेकांची अडचण झाली आहे.

# डॉ. मनमोहन सिंग हे भारताच्या जागतिकीकरणाचे जनक; माजी महापौर योगेश बहल

## राष्ट्रवादी मध्यवर्ती कार्यालयात डॉ. मनमोहन सिंग यांना श्रध्दांजली अर्पण

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे सकाळी ११.३० वा. शहराध्यक्ष मा.योगेश मंगलसेन बहल यांच्या हस्ते डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पन करून आदरांजली वाहण्यात आली.



यावेळी बहल म्हणाले की, डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून त्यांनी उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केली.

तत्कालीन पंतप्रधान असतांना, डॉ.मनमोहन सिंहांच्या आधार कार्ड संकल्पनेचं कौतुक संयुक्त राष्ट्र अर्थात यूएनने केलं होतं, तसेच डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळातच 'राईट टू एज्युकेशन' (RTE) अर्थात शिक्षणाचा अधिकाराचा कायदा हा एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला, याअंतर्गत ०६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार निश्चित करण्यात आला, आर्थिक दृष्ट्या दुर्बल समाजातील मुलांना शैक्षणिक सवलतितिचा निर्णय घेतला.

सदर कार्यक्रमानंतर माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे तैल्यचित्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहामध्ये असाव असा ठराव सर्वानुमते शहराध्यक्ष योगेश बहल यांनी मांडला त्यास महिला अध्यक्षा कविता आल्हाट तसेच कार्याध्यक्ष संतोष बारणे यांनी अनुमोदन दिले.

# हजारो डी. फार्मसी पदविकाधारकांचे भवितव्य अधांतरी

## एक्झिट एक्झाम 5 महिने रखडली, विद्यार्थ्यांसाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया या शिखर संस्थेने एक्झिट एक्झाम देणे बंधनकारक केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

औषध निर्माणशास्त्र शाखेतील पदविका (डी. फार्मसी) प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय) या शिखर संस्थेने एक्झिट एक्झाम देणे बंधनकारक केले आहे. त्यानंतरच या विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणून आपापल्या राज्यातील फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीसाठी अर्ज करता येतो. अधिकृत नोंदणी झाल्यावर प्रमाणपत्र मिळते. या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी अथवा व्यवसाय सुरू करता येतो. मात्र, मागील पाच महिन्यांपासून एक्झिट एक्झाम झालेली नाही. परिणामी डी. फार्मसी पदविकाधारक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे.

औषधनिर्माण क्षेत्रातील शिखर संस्था फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय, नवी दिल्ली) व त्यास अनुसरून इतर संस्थांमधील समन्वयाच्या अभावामुळे देशातील औषध निर्माणशास्त्र शाखेत शिक्षण घेणारे विद्यार्थी भरडले जात आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील पदवी व पदव्युत्तर-अभ्यासक्रमातील (बी. फार्मसी, एम. फार्मसी) प्रवेश प्रक्रियेला झालेला विलंब त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये डी. फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक केलेल्या एक्झिट परीक्षेस झालेला विलंब विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा आहे.

औषधनिर्माण शास्त्र शाखेतील पदविका (डी. फार्मसी) अभ्यासक्रमावर आधारित एक्झिट एक्झाम ही प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावर राबवण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून देशातील सर्व औषध निर्माणशास्त्र पदविका प्राप्त विद्यार्थ्यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय) या शिखर संस्थेने एक्झिट एक्झाम देणे बंधनकारक केले आहे. औषधनिर्माण शास्त्र शाखेतील दर्जात्मक व गुणात्मक शिक्षणातून तज्ज्ञ व कुशल फार्मासिस्ट घडवणे, त्याचबरोबर बदलत्या काळानुसार सक्षम रुग्णसेवा देऊन औषध निर्माणशास्त्र या शाखेचा दर्जा उंचावणे या हेतूने डी. फार्मसी एक्झिट एक्झाम घेण्याचा धोरणात्मक निर्णय पीसीआयने घेतला आहे. ही परीक्षा नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सेस (एनबीईएमएस, नवी दिल्ली) यांच्यामार्फत घेण्यात येणार आहे.



### नोंदणीस अडथळा येत असल्याचा विद्यार्थ्यांचा अनुभव !

» डी.फार्मसीचा विद्यार्थी म्हणाला की, या परीक्षेला विलंब होत असल्याने डी. फार्मसी परीक्षा उत्तीर्ण होऊनही विद्यार्थ्यांना फार्मासिस्ट म्हणून फार्मसी ऑफ इंडियाकडे अधिकृत नोंदणी करता येत नाही. परिणामी औषध निर्माणशास्त्र शाखेची पदवी असूनही नोकरी अथवा व्यवसाय सुरू करता येत नाही. अशा कोंडीत हा युवक वर्ग सापडला आहे. या विद्यार्थ्यांची ही मोठी शोकांतिका आहे. अशी स्थिती सर्व देशभरातील औषधनिर्माण शास्त्र शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची झाली आहे. याबाबत संबंधित यंत्रणेचे झालेले दुर्लक्ष विद्यार्थ्यांच्या करीअरसाठी घातक ठरत आहे याकडे गांभीर्याने पाहणे व निर्णय घेणे अपेक्षित आहे.

### विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांमध्येही संभ्रम

» एका नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले की, देशातील जवळपास २८९२ फार्मसी महाविद्यालयांतून १ लाख ७२ हजार ९२० दरवर्षी प्रवेश घेतात. यामधील सरासरी एक लाख विद्यार्थी उत्तीर्ण होतात. त्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या एक्झिट एक्झाम वेळेत न झाल्याने विद्यार्थ्यांपुढे व त्यांच्या पालकांपुढे विविध समस्या निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. एक्झिट एक्झाम ही परीक्षा कधी व कशी होणार, याबाबत अद्याप कोणताही निर्णय अथवा आदेश संबंधित यंत्रणेकडून महाविद्यालयांना प्राप्त न झाल्याने देशभरातील डी. फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे


# विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमानिमित्त पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतुकीत बदल

## आदेश प्रभारी जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पेरणे (ता. हवेली) पेरणे येथे विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी दरवर्षी 1 जानेवारी रोजी मोठ्या प्रमाणावर अनुयायी येत असतात. अभिवादन कार्यक्रमानिमित्त पुणे-अहिल्यानगर महामार्ग क्र. 60 वर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी 31 डिसेंबर 2024 रोजी सायं. 5:00 वा. पासून ते 1 जानेवारी 2025 रोजी रात्री 12:00 वा. पर्यंत दोन्ही बाजूकडील वाहतुकीत तात्पुरत्या स्वरुपात बदलाचे आदेश प्रभारी जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले आहेत.

याअंतर्गत चाकण ते शिक्रापूर व शिक्रापूर ते चाकण अशी दोन्ही बाजूकडील जाणारी-येणारी सर्व प्रकारची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. अहिल्यानगर कडून पुणे-मुंबईकडे येणारी जड वाहने ही शिरुर, न्हावरा फाटा, न्हावरा, पारगाव, चौफुला, यवत, हडपसर या मार्गे पुण्याकडे जातील.



पुण्याहून अहिल्यानगरकडे जाणारी जड वाहने खराडी बाह्यवळण येथून हडपसरवरुन पुणे-सोलापूर महामार्गाने चौफुला, केडगाव मार्गे न्हावरा, शिरुर-अहिल्यानगर मार्ग अशी वळविण्यात येतील. तसेच सोलापूर महामार्गावरुन आळंदी, चाकण या भागात जाणारी जड वाहने, ट्रक, टेम्पो आदी माल वाहतूक हडपसर, मगरपट्टा, खराडी बाह्यवळणमार्गे विश्रांतवाडीहून आळंदी व चाकण येथे जातील.

मुंबईहून अहिल्यानगरकडे जाणारी जड वाहने, ट्रक, टेम्पो आदी माल वाहतूक वडगाव मावळ, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटामार्गे अहिल्यानगरकडे जातील. मुंबईहून अहिल्यानगरकडे जाणारी कार, जीप आदी हलकी वाहने वडगाव मावळ, चाकण, खेड, पाबळ, शिरुर मार्गे अहिल्यानगरकडे जातील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# चारचाकींसाठी लवकरच नवीन मालिका

## आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

चारचाकी खासगी वाहनांसाठी लवकरच सुरू होणाऱ्या 'एमसी' या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक शुल्क भरुन राखून ठेवण्याकरिता आगाऊ अर्ज करण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने करण्यात आले.

मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. हा अर्ज आणि धनाकर्ष (डीडी) ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० दरम्यान कार्यालयात पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करणे आवश्यक राहील. सदर डीडी 'डी.वाय. आर.टी.ओ. पिंपरी चिंचवड' यांच्या नावे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेचा पुणे येथील असावा. एकाच क्रमांकाकरिता जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी कार्यालयीन सूचनाफलकावर लावण्यात येईल.



या यादीतील अर्जदारांनी लिलावासाठी जास्त रक्कमेचा एकच डीडी ३१ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात घालून कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तिसमोर लिफाफे उघडून ज्या अर्जदाराने जास्तीत जास्त रकमेचा धनाकर्ष (डीडी) सादर केला असेल त्यास पसंती क्रमांक वितरीत केला जाईल. लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने क्रमांक आरक्षित करण्यासाठी नागरिकांना उपलब्ध करण्यात येतील.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेले शुल्क शासनाच्या तिजोरीत जमा होईल. अधिक माहितीसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये यांनी केले आहे.

# पिंपरी-चिंचवडवर तिसऱ्या डोळ्याची नजर!

## कार्यालये, दुकानांसमोर एक कॅमेरा रस्त्याच्या दिशेने बसवावा : पोलिसांचं आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील सार्वजनिक ठिकाणी राज्य शासनाकडून एक हजार ४०८ आणि स्मार्ट सिटी अंतर्गत तीन हजार ५०० असे चार हजार ९०८ बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांचा वाहतूक नियोजन, गुन्हेगारी प्रतिबंध यासाठी वापर होत आहे. शहरातील आस्थापनांनी कार्यालये, दुकानांसमोर एक कॅमेरा रस्त्याच्या दिशेने बसवावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केले आहे.

शहरातील नागरिकांकडून घरे, कार्यालये अथवा दुकानांपुरता सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात येतो. अनेक जण रस्त्याच्या दिशेने कॅमेरा लावणे टाळतात. त्यामुळे एखाद्या ठिकाणी चोरी झाल्यास चोरीच्या घटनेचे चित्रीकरण पोलिसांच्या हाती लागते. मात्र, चोर कोणत्या दिशेने आले आणि गेले, याबाबत तत्काळ माहिती मिळत नाही. रस्त्याच्या दिशेने कॅमेरा आहे का, हे पोलिसांना शोधावे लागते. जिथे कॅमेरा असेल तिथून चित्रीकरण मिळवून पुढील कारवाई केली जाते. यामध्ये पोलिसांचा वेळ जातो. तर, आरोपींना पळून जाण्यासाठी वेळ मिळतो. रस्त्याच्या दिशेने कॅमेरे बसविल्यास रस्त्यावर कोणतीही अनुचित घटना घडल्यास आरोपीची ओळख पटविण्यासाठी मदत होऊ शकते, असे पोलिसांनी सांगितले.

अनेक नागरिकांनी घरे आणि दुकानांसमोर सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. एक कॅमेरा घर अथवा दुकानासमोरील रस्ता निगराणीत येईल, अशा पद्धतीने लावणे आवश्यक आहे. त्यामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येईल. तसेच घडलेल्या गुन्ह्यांच्या तपासासाठी ते उपयोगी ठरतील, असे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी सांगितले.

### 'सीसीटीव्ही'द्वारे गंभीर गुन्ह्यांची उकल

» अनेक गुन्ह्यांतील आरोपींना पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने अटक केली आहे. इतर राज्यांतून शहरात येऊन एटीएम फोडणाऱ्या टोळीला सीसीटीव्ही चित्रीकरणावरून पोलिसांनी अटक केली होती. चिखलीमध्ये तीन वर्षांच्या मुलीचे नरबळीसाठी अपहरण झाले होते. त्या गुन्ह्यातील आरोपींनादेखील केवळ सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे अवघ्या काही तासांत अटक केली होती. भोसरी येथे एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून गोव्याला पळून जात असलेल्या आरोपीलादेखील सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे अटक करण्यात आली होती.

### निर्जन ठिकाणांवरही निगराणी महत्त्वाची

» सार्वजनिक ठिकाणी महापालिकेने सीसीटीव्ही बसवले आहेत. खासगी आस्थापनांसमोर सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. मात्र, शहरातील मोकळी मैदाने, मोकळ्या जागा, महामार्ग आणि इतर निर्जन ठिकाणी सीसीटीव्ही नाहीत. शहरातील एमआयडीसी परिसरात अनेक कंपन्या बंद पडल्या आहेत. अशा ठिकाणीदेखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासह पोलीस गस्त वाढविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली.

# 'एक दिवस शाळेसाठी' उपक्रमातून जनजागृती

## पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांची विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन मोहीम




**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना भविष्यात जबाबदार नागरिक बनवण्यासाठी त्यांच्या शालेय जीवनात योग्य शिस्त लावणे गरजेचे आहे. शाळेतच विद्यार्थ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली तर ते भविष्यात समाज आणि देशासाठी काहीतरी चांगले करू शकतात. यासाठी पिंपरी-चिंचवड ट्राफिक पोलिसांनी 'एक दिवस शाळेसाठी' ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाअंतर्गत पोलिसांनी आतापर्यंत ७३ हजार ७६१ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

शहरात अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारी कृत्यात सहभाग वाढत आहे, जो समाजासाठी गंभीर चिंता आहे. काही विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच 'भाईगिरी'चे आकर्षण वाटते आणि अनावधानाने ते गुन्हेगारीच्या वाटेवर जातात. याचा त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर नकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करणे अत्यावश्यक आहे. यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी 'एक दिवस शाळेसाठी' ही मोहीम सुरू केली आहे.

शहरातील १४ वाहतूक विभागांसाठी २० टीम तयार करण्यात आल्या आहेत. प्रत्येक वाहतूक विभागाची एक टीम, वाहतूक मुख्यालय, योजना विभाग, प्रशासन विभाग यासह साहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त स्तराच्या टीम यामध्ये समाविष्ट आहेत. या टीम्स प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा योग्य वापर, व्यसनांपासून दूर राहणे, महिलांचा सन्मान करणे इत्यादी विषयांवर मार्गदर्शन केले जाते. या मार्गदर्शनाची नोंद करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याच दिवशी अहवाल सादर केला जातो. अहवालासोबत शाळेत मार्गदर्शन करताना घेतलेल्या दोन छायाचित्रांचाही समावेश असतो.

### उपक्रमाचा 17 वा टप्पा पूर्ण

» 'एक दिवस शाळेसाठी' या उपक्रमाचा १७ वा टप्पा नुकताच पूर्ण झाला आहे. यामध्ये ४,१४५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आतापर्यंत या उपक्रमाअंतर्गत एकूण ७३ हजार ७६१ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले गेले आहे.

> विद्यार्थी जबाबदार नागरिक आणि चांगले माणूस बनावेत, यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने 'एक दिवस शाळेसाठी' ही मोहीम सुरू केली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते. काही विद्यार्थी त्यांच्या समस्या आमच्यासमोर मांडतात आणि त्या समस्यांवर तत्काळ कार्यवाही केली जाते.
>
> - बापू बांगर, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग, पिंपरी-चिंचवड.

# आळंदी पंचक्रोशीत बेकायदा प्लॉटिंगचे पेव!

## पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील आळंदी, मरकळ या भागांतून बहुप्रतीक्षित रिंगरोड जात असल्याने व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अगदी वेशीवरच हा भाग असल्याने येथील जमिनीत गुंतवणुकीला सोन्याचे भाव आले आहेत.

आळंदी शहराच्या चारही बाजूंच्या 10 ते 15 किलोमीटर अंतरावरील ग्रामपंचायत हद्दीत तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करत जोर धरलेला प्लॉटिंग धंदा धडाक्यात सुरू आहे. यामध्ये मध्यमवर्गीयांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होण्याचा धोका निर्माण झाला असला, तरी मोठ्या राजकीय दबावामुळे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.



साधारण 2014 मध्येच आळंदी, मरकळ, कुरुळी आदी भागांतून रिंगरोड जाणार असल्याची घोषणा झाली व नंतर भूसंपादन होणार असल्याची चर्चा सुरू झाली. यानंतर आळंदी शहरालगत गुंतवणूक करण्यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड येथील गुंतवणूकदार व आजी-माजी नेत्यांनी जागेचा फायदा घेण्यासाठी मोठी गुंतवणूक केली. आळंदी शहरालगत व आळंदी मंडलाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांमध्ये नैसर्गिक स्रोत असणारा ओढा मुरुम, माती, दगड टाकून प्रवाहांना अडथळा ठरतील असे बेकायदा प्लॉट पाडून विक्री करण्याचा सपाटा काही बड्या व धनदांडग्यांनी सुरू केला आहे. शेतजमिनीचे बेकायदा एक एका गुंठ्याचे प्लॉट पाडून विक्री होत आहे. यात महसूल विभागातील मंडळी देखील कायद्यातील पळवाटा शोधून अशा नोंदी सातबारावर घेत आहेत. आळंदीलगत परिसरातील गावांच्या हद्दीत जमिनीचे रहिवास अथवा इतर कारणांकरिता विकसित करण्यासाठी संबंधित जागेचे रेखांकन मंजूर करणे, संबंधित जमिनीच्या अकृषिक वापरासाठी परवानगी घेणे आणि त्यानंतर जमिनीवर विकास करणे अपेक्षित असते. मात्र, याला फाटा दिला जात आहे.

रेखांकित जमिनीत मोकळा ठेवण्यात आलेला भूखंड विकसित करून देणे, दिवाबत्तीची व्यवस्था, जलनिस्सारण गटारांची व्यवस्था, आवश्यक रस्ते व संरक्षक भिंत बांधून देण्याची जबाबदारी रेखांकनधारकाची असताना याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याच्या बाबी समोर येत आहेत.

**आळंदी मंडलामधील खालील गावांमध्ये बेकायदा प्लॉटिंगचे पेव**

आळंदी मंडल कार्यक्षेत्रात येणाऱ्या आळंदी ग्रामीण, केळगाव, चऱ्होली खुर्द, मरकळ, सोळू, धानोरे, वडगाव घेनंद, गोलेगाव, वडगाव-पिंपळगाव, कोयाळी आदी गावांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात बेकायदा प्लॉटिंग करून ग्राहकांना आकर्षित करत त्याची विक्री केली जात आहे.

### बेकायदा व्यवसायाला प्रशासनाची साथ

**» आळंदी भागातील प्लॉटिंग दलालांनी प्रशासनातील अनेकांना हाताशी धरून ओढ्यालगत जमीन, डोंगर, टेकड्या, वादावादी व वतनी, इनामी जमिनींचे प्लॉटिंग चालविले आहे. अशिक्षित व गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने लाटून तो प्लॉट चौपट, पाचपट दराने बेकायदेशीरपणे विक्री केला जात आहे आणि या दलालांना महसूल विभागातील मंडळी देखील लालसेपोटी कायद्यातील पळवाटा दाखवत अशा नोंदी सातबारावर घेत आहेत.**

# ‘उजनी’तील विसर्गामुळे पक्ष्यांची संख्या वाढणार!

## तुडुंब भरलेल्या धरणाचे काही काठ उघडे पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यांसह मराठवाड्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातून (यशवंत सागर जलाशय) सध्या सोलापूर शहरवासीयांची तहान भागवण्यासाठी बुधवारपासून (दि. 25) पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. परिणामी, तुडुंब भरलेल्या धरणाचे काही काठ उघडे पडून स्थानिक व स्थलांतरित पक्ष्यांना मुबलक खाद्यान्न उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत पक्ष्यांची गर्दी वाढेल, असा अंदाज पक्षिअभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी व्यक्त केला आहे.



यावर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे धरण ओव्हरफ्लो झाले होते. त्यामुळे पक्ष्यांचा चराऊ भाग लवकरच म्हणजे सप्टेंबर महिन्यातच पाण्याने झाकला होता. त्यानंतर सतत पडणारा पाऊस व लांबलेल्या पावसाने धरणाच्या काठावर पक्ष्यांना खाद्यान्नाचा तुटवडा जाणवू लागला होता.

विशेषकरून काठावर चरणाऱ्या करकोचा वर्गातील पक्ष्यांचे मोठे हाल सुरू होते. मात्र, आता खाद्यान्न उपलब्ध होताच विविध प्रकारचे करकोचे पाणलोट क्षेत्रात गर्दी करतील, असा अंदाज आहे.

फ्लेमिंगोची संख्या वाढणार : उजनी धरणाचे मुख्य आकर्षण असलेले फ्लेमिंगो (रोहित) पक्षी गेल्या महिन्यात पाच-पन्नास संख्येने दाखल झाले आहेत. धरणातील विसर्गामुळे यापुढे मुबलक खाद्य उपलब्ध होणार असल्यामुळे आणखी फ्लेमिंगो येण्याची शक्यता आहे.

> “ उजनी धरण गेले तीन महिने काठोकाठ भरून असल्यामुळे पक्ष्यांचा चराऊ भाग पाण्यात बुडाला होता. त्यामुळे पक्ष्यांना खाद्य उपलब्ध होत नव्हते. अन्नाच्या शोधात पक्षी जिल्ह्यातील अन्य छोट्या-मोठ्या तलाव, पाणवठे व शेतशिवारातील तालीत विखुरलेले होते. आता धरणातील पाण्याचा विसर्ग केल्यामुळे स्थानिक व स्थलांतरित पक्षी उजनीवर गर्दी करतील. -
>
> **- डॉ. अरविंद कुंभार, ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक.**

### पाणलोट क्षेत्रात आढळणारे पक्षी

**» चित्रबलाक (पेंटेड स्टॉर्क), मुग्धबलाक (ओपनबिल स्टॉर्क), चमचेचोच (स्पून बी), काळे व पांढरे कुदळे (ब्लॅक अँड व्हाईट आयबीस), पाणकावळे (कार्मोरंट), सर्पपक्षी (स्नेक बर्ड), शेकाट्या (स्टिल्ट), राखी बगळा (ग्रे हेरॉन), वंचक (पाँड हेरॉन), मध्यम व पात बगळे (मेडियन अँड लिटल इग्रेट), लाल गाल्या टिटवी (रेड वॅटल्ड लॅपविंग), तुतुवार, अबलक व छोटा खंड्या (पाईड व लिटल किंगफिशर), बंड्या (व्हाईट ब्रेस्टेड किंगफिशर), पाणीटिलवा (शांक), पाणटिवळा (गॉडविट), पाणलावा (स्नाईप), तुतुवार (सँडपाईपर).**